# निशाणी क्र.२४ वरील आदेश

वादीने सदर अर्ज त्याचे दाव्यात दुरूस्तीसाठी केला आहे. प्रतिवादीने सदर अर्जावर त्याचे म्हणणे दिलेले आहे. अर्ज व म्हणणे वाचले.

२. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. वादीच्या वतीने उषादेवी वि. रिजवान अहमद अपील क्र. ४१८/२००८ नि.ता. १७ जानेवारी २००८ व सज्जनकुमार वि. रामकिसन केस नं. ६२९९/२००४ नि.ता. २२ ऑगस्ट २००५ या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायानिर्णयाचा आधार घेण्यात आला तर प्रतिवादीच्या वतीने मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या शिवानंद अशोक हिरेमठ वि. दिपक अशोक हिरेमठ या (२०१८ (२) एम.एच.एल.जे.) या न्यायनिर्णयाचा आधार घेण्यात आला.

३. खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे:-

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दाव्यातील प्रस्तावित दुरूस्तीस परवानगी देणे योग्य आहे का? | होय. |
| २. | आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

**मुद्दे क्र.१ व २:-**

४. वादीने प्रस्तुत अर्जाव्दारे दावा दाखल करतांना दाव्यामध्ये अनावधानाने व अपु-या माहितीमुळे दाव्याच्या मुळाशी जाणारे व वाटणीच्या अनुषंगाने काही मद्दे दाव्यामध्ये नमुद करणे राहलेले असल्याने वादीला त्याअनुषंगे दाव्यात दुरुस्ती करावयाची आहे. वादी मागत असलेली दुरुस्ती ही वडिलोपार्जीत मिळकती अनुषंगेचा असुन अर्जामध्ये नमुद केलेला दुरुस्ती अनुषंगेचा प्रस्तावित मजकुर दाव्यामध्ये परिच्छेद १ नंतर १-अ म्हणुन अर्जात नमुद परिच्छेद दुरुस्तीअन्वये समाविष्ठ करण्यासाठी अर्जाव्दारे विनंती केली आहे. सदर दुरुस्ती ही दाव्याच्या मूळ स्वरुपात बदल घडविणारी नसुन योग्य न्यायनिर्णयासाठी दुरुस्तीस परवानगी

मिळणे आवश्यक आहे. तर, प्रतिवादीने त्याचे म्हणण्याव्दारे अर्जास तीव्र विरोध दर्शवून दावा दाखल झाल्यानंतर नियमानुसार पक्षकार समाविष्ठ करता येतात परंतु मिळकती समाविष्ठ करता येत नाहीत. प्रस्तावित दुरूस्तीमुळे दाव्याचे स्वरूप बदलते सदर अर्ज मंजुर करणे न्याय होणार नाही असे म्हणणे मांडून खर्चाची मागणी केलेली आहे.

५. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ हा दाव्यातील पक्षकाराना त्यांचा दावा किंवा कैफियत न्यायालय ठरवेल त्यानुसार परवानगीची संधी देणे असा आहे. दुस-या बाजुचे अपरिमीत नुकसान होत नसेल किंवा त्यांच्यावर गंभीर अन्याय होत नसेल तर दुरूस्ती मान्य करायला न्यायालयास मुभा आहे जर दुरूस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरूपात काही बदल होणार नसेल तर दुरूस्ती मान्य करता येते.

६. प्रस्तावीत दुरुस्ती ही मुद्दे कायम केल्यानंतर प्रकरण वादीच्या पुराव्यासाठी ठेवलेले टप्पयावर असतांना करण्याचा वादीचा मानस आहे. वादी मागीत असलेल्या दुरुस्ती अथवा समाविष्ठ करू इच्छित असलेला मजकुर ही दावा मिळकतीच्या संदर्भातील काही तथ्य असल्याचे दिसुन येते. वादीने सदरची तथ्य ही वादीच्या वतीने दावा दाखल करतांना काही बाबी दाव्यात समाविष्ठ केले नसल्याचे वादीचे कथन आहे. जरी, प्रस्तुत दावा पुराव्याच्या टप्प्यावर असला तरी वादीतर्फे अदयाप सदर प्रकरणात वादीचा पुरावा दाखल करण्यात आलेला नाही अथवा उलटतपासही झालेला नाही. त्यामुळे, सदर प्रकरण ही सकारात्मरित्या पुराव्यास लागलेले आहे असे म्हणता येणार नाही. जरी, प्रस्तुत प्रकरणात मुद्दे कायम केले असले तरी, दावा दुरुस्तीनंतर प्रतिवादीस त्याचे दुरुस्तीच्या अनुषंगे कैफियत देण्याची संधी मिळणार आहे. अर्जातील प्रस्तुत दुरुस्तीच्या अनुषंगेचा मजकुर हा घटनेचा तथ्य असल्याने वादीस त्याचे पूर्ण कथन अभिलेखावर आणण्यासाठी दाव्यात दुरुस्तीची परवानगी देणे योग्य ठरणार आहे. याठिकाणी हे नमुद करणे हे गरजेचे वाटते की, प्रस्तुतचा दावा हा एकत्र कुंटुंबातील अवभाजीत मिळकत वाटून व त्याचा स्वंतत्र ताबा मिळावा यासाठी केलेला आहे. त्याअनुषंगे दावा मिळकती हया वडिलोपार्जीत व संयुक्त कुंटूबांच्या मिळकती आहेत का याअनुषंगेचा मुद्दा कायम करण्यात आलेला आहे. वादी प्रस्तावित अर्जाव्दारे अर्जात नमुद घर मिळकत ही वडिलोपार्जीत असुन असे कथन घेवुन आलेला आहे. याव्यतिरीक्त वादी व

प्रतिवादी क्र. २ व ३ यांच्या घराच्या अनुषंगेसुध्दा तथ्य अभिलेखावर आणू ईच्छित आहे.

७. प्रतिवादीने शिवानंद अशोक हिरेमठ वि. दिपक अशोक हिरेमठ या २०१८ (२) एम.एच.एल.जे. या मा. मुंबई उच्च न्यायालय यांच्या न्यायनिर्णयावर भिस्त ठेवून असे प्रतिपादन केले की, दाव्यामध्ये आवश्यक ते पक्षकार समाविष्ठ करता येतील मात्र मिळकती समाविष्ठ करता येणार नाही. मा. उच्च न्यायालयाचा आदर राखून या ठिकाणी नमुद करणे संयुक्तीक आहे की, सदर न्यायनिर्णयातील तथ्य व प्रस्तुत अर्जातील तथ्य ही एकसारखी नाहीत. सदर प्रकरणात वादीचा पुरावा पुर्ण झालेला होता व प्रस्तुत प्रकरणात अदयाप वादीने पुरावा दिलेला नाही त्यामुळे सदर न्यायनिर्णय हा प्रतिवादीला सहाय्यभूत होणार नाही.

८. वादी हा दावा मिळकतीमध्ये आणखी एक मिळकत समाविष्ठ करू इच्छित आहे व वादीच्या कथनानुसादर सदर मिळकत ही त्याचे वडिलोपार्जीत मिळकत आहे. सदर दुरूस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरूपात कोणताही आमुलाग्र असा बदल होत नाही अथवा प्रतिवादीचे अपरिमीत असे हानी होईल असेही दिसून येत नाही. याउलट, सदर अर्ज नांजुर करण्यास दाव्याचे अनेकीकरण होण्याची शक्यता ही नाकारता येणार नाही. या ठिकाणी हे नमुद करावे लागेल की, प्रस्तावीत दुरुस्तीच्या अनुषंगे वादीने विलंब केलेला आहे. मात्र, सदरच्या विलंबामुळे प्रतिवादीचे झालेले नुकसान हे खर्चाच्या स्वरूपात भरून काढता येईल. सबब, मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. २ खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. वादीचा नि.२४ वरील अर्ज रुपये २५००/- खर्च प्रतिवादीस देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत अर्जात नमूद केल्याप्रमाणे वादीस दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

३. सदरची दुरुस्ती वादीने विहित मुदतीत करावी व दुरुस्त प्रत सादर करावी.

SHARAD NARAYAN GAVALI Digitally signed by SHARAD NARAYAN GAVALI

दिनांकः- २८.११.२०२२

**(शरद ना. गवळी)**
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
रिसोड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same word to word, as per the original **Order.**

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | **Rohan S. Koshti (L.G.)** |
| Name of court | : | Jt.C.J.J.D.& JMFC, Risod. |
| Date | : | 28.11.2022 |
| Order signed by the Presiding Officer | : | 28.11.2022 |
| **Order uploaded on** | **:** | **29.11.2022** |